पोलीस अधीक्षक कार्यालय,गडचिरोली,
दिनांक : २८/०६/२०१८

# वार्तापत्र

## ‘ धर्मा निमाई रॉय याच्यावर एम.पी.डी.ए. कायदयांतर्गत कारवाई.’

चामोर्शी तालुक्यातील धर्मा निमाई रॉय याच्या विरूध्द महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी विषयक गुन्हेगार धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती, (व्हिडीओ पायरेटस) वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती यांचे विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा अधिनियम १९८१ (एम.पी.डी.ए कायदा )च्या कायदयान्वये स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव मा.पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली यांचे कडुन मा.जिल्हा अधिकारी कार्यालय, गडचिरोली यांना सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या आधारे मा. जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी धर्मा रॉय याच्यावर एम.पी.डी.ए कायद्यांतर्गत कारवाईस मान्यता देवुन त्याची रवानगी जिल्हा मध्यवर्ती कारागृह चंद्रपुर येथे करण्यास आदेश दिला.

धर्मा रॉय याचेवर गडचिरोली जिल्हयातील विविध पोस्टे, उपपोस्टे तसेच पोमकें स्तरावर अनेक गंभीर गुन्हयांची नोंद आहे. धर्मा निमाई रॉय याचेवर केलेल्या कारवाईमुळे इतर अवैध दारु व्यावसायिकांवर जरब बसेल असा वि:श्वास प्रभारी पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी व्यक्त केला.